# आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे कळंबोलीकरांना मिळणार न्याय

नागपूर (प्रतिनिधी) पनवेल तालुक्यातील कळंबोली वसाहतींमधील सर्व रस्ते तातडीने दुरूस्ती करण्यासाठी सिडकोला सुचना करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे नगरविकास राज्य मंत्री उदय सामंत यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात मंगळवारी दिली असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी यासंदर्भात अधिवेशनात आवाज उठविल्यामुळे कळंबोलीकरांना न्याय मिळणार आहे.

रायगड जिल्हयातील पनवेलजवळील कळंबोली वसाहतीतील रस्त्यांवर पावसाळयापूर्वी डांबरीकरण करण्यात आलेले असतानाही या रस्त्याचे ठेकेदाराकडून झालेल्या निकृष्ट कामामुळे रस्त्यात खड्डयांचे साम्राज्य पसरल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून या प्रश्नावर चर्चा व प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिवेशनात उपस्थित केला होता. या विषयावर विस्तृत चर्चा व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली विनंती ग्राहय धरून त्यांच्या विनंतीनुसार हा प्रश्न विधानसेभेचे सभापती दिलीप वळसे-पाटील यांनी सखोल चर्चा व उपाययोजनेसाठी राखून ठेवला होता. या प्रश्नावर आज सभागृहात विस्तृत चर्चा झाली. कळंबोली शहराची लोकसंख्या दिड लाखाहून अधिक असून सर्वसामान्य मध्यमवर्गीय माथाडी कामगार या शहरामध्ये राहत आहेत. येथील रस्त्यांची वारंवार कामे करून सुध्दा हे रस्ते सातत्याने खराब होत राहतात. आणि त्यामुळे एकीकडे पाण्याची पातळी कमी असल्याचे कारण संबंधितांकडून दिले जात आहेत. हे रस्ते सतत खराब होत असतील तर वारंवार डांबरीकरण करण्यापेक्षा खारघर शहराच्या धर्तीवरती सिडको कळंबोली वसाहतीमधील रस्ते कॉंक्रीटीकरण करणार का असा प्रश्न सभागृहात आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केला.

या संदर्भात नगरविकास राज्यमंत्री उदय सामंत यांनी सभागृहात सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केलेला प्रश्न व सुचनांचा विचार करणे गरजेचे आहे. कळंबोलीतील सिडकोच्या वसाहतीमधील रस्ते पावसाळयात पाण्याखाली जातात त्यामुळे येथील रस्त्यांना वारंवार खडडे पडत आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सुचना महत्वाच्या असून कळंबोली वसाहतीमधील येथील रस्ते कॉंक्रीटीकरण करण्याबाबत सिडकोला सुचना करण्यात येतील, असे सभागृहात झालेल्या चर्चेवेळी ना. सामंत यांनी सांगितले.